बृहन्मुंबई महानगरपालिका

सेठ गो. सु. वैद्यकीय महाविद्यालय, परळ

क्र. जीएसएमसी/१६५/जीएसपी दि.१६.०६.२०२६

## 'वैद्यकीय अधिक्षक' म्हणुन तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्याबाबत जाहिरात

संदर्भ – क्र.अति.आयुक्त/प.उप./८१०८/डी दि.११.०६.२०२६

मा.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प.उप.) यांच्या उपरोक्त संदर्भित आदेशानुसार राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या विहित अर्हतेनुसार वैद्यकीय अधिक्षक म्हणुन सेठ गो.सुं.वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असणारे सहयोगी प्राध्यापक / प्राध्यापक संवर्गातून कोणत्याही मानधनाशिवाय नियुक्ती करावयाची आहे. 'वैद्यकीय अधिक्षक' पद स्थानिक पातळीवर जाहिरात प्रकाशित करून शैक्षणिक अधिष्ठाता / अधिष्ठाता यांच्या अधिपत्याखाली मुलाखती घेऊन मंजुरीनंतर नियुक्तीच्या दिनांकापासुन एक वर्षाच्या कालावधीकरीता भरावयाचे आहे.

### 'वैद्यकीय अधिक्षक' नियुक्तीकरीता अर्हता :-

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने (NMC) दि.१४.०२.२०२२ रोजीच्या राजपत्रातील अधिसुचनेमधील ३.७ मध्ये 'वैद्यकीय अधिक्षक' पदावर नेमणुक करण्याबाबतच्या अर्हता पुढील प्रमाणे नमुद केले आहे.

''The Medical Superintendent of the affiliated teaching hospital shall possess a recognized postgraduate medical degree from a recognized Institution with a minimum of a ten Years teaching experience as Professor / Associate Professor in the relevant departments of the Hospital, out of which at least five years should be as Professor. Appointment to these posts shall be made on seniority-cum-merit basis. Medical Superintendent shall not occupy the position of the Head of the Department. However, he can head the unit.''

### सर्वसामान्य अटी :-

१. सदर नियुक्ती फक्त वाढता कार्यभार सुरळीत चालू ठेवण्याकरीता तात्पुरत्या स्वरूपाची उपाययोजना म्हणुन नियुक्तीच्या दिनांकापासुन एक वर्षाच्या कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपात करण्यात येईल.

२. महानगरपालिकेतील इतर महानगरपालिकेतील वैद्यकीय महाविद्यालय / रूग्णालयातील वैद्यकीय अधिक्षकांप्रमाणे कोणतेही आर्थिक लाभ किंवा अधिकार नसतील.

३. सदर तात्पुरत्या स्वरूपाची उपाययोजना विहित वेळेपूर्वी देखील खंडीत करण्यात येऊ शकते.

४. वैद्यकीय अधिक्षकास कोणतेही अतिरिक्त वेतन दिले जाणार नसून ते धारण करत असलेल्या प्राध्यापक पदाच्या पदासोबत वैद्यकीय अधिक्षक या पदाचा कार्यभार संभाळतील. त्यांची वैद्यकीय अधिक्षक म्हणुन नियुक्ती झाल्यास विभागप्रमुख पद धारण करता येणार नाही

५. वैद्यकीय अधिक्षकांच्या जबाबदा-या व कर्तव्ये अधिष्ठातामार्फत तयार करण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यभार स्विकारावा लागेल.

### विशेष निर्देश :-

सेठ गो.सुं.वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील वर नमुद केलेल्या अर्हता पूर्ण करीत असलेल्या पात्र कार्यरत प्राध्यापक / सहयोगी प्राध्यापकांनी लेखी अर्ज अधिष्ठाता (सेठ गो.सुं.वै.म.) यांजकडे संबंधित विभागप्रमुखामार्फत दि.२५.०६.२०२६ पर्यंत सादर करावेत.

मुलाखतीचे वेळापत्रक संबंधितांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

डॉ.हरिश पाठक

अधिष्ठाता (प्र)

(सेठ गो.सु.वैद्यकीय महाविद्यालय)